Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

राष्ट्रहिताय संस्कृतम्

# Journal of Fundamental & Comparative Research

This is to certify that the article entitled

## लाला लजपत राय यांचे हिंदू संघटनेतील योगदान

Authored By

**प्रा.डॉ. राजेंद्र रासकर**
इतिहास विभाग प्रमुख रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब महाविद्यालय, ८५, शिंदे सरकार वाडा, वार्ड नं ८,औंध, पुणे – 67 (ता.हवेली जि. पुणे. पिन कोड ४११०६७)

Published in
**Shodhsamhita** : Journal of Fundamental & Comparative Research
Vol. VII, No. 12(II) : 2021
ISSN: 2277-7067
UGC Care Approved, Peer Reviewed and Referred Journal
Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
University Grants Commission
Approved Journal

Editor
Prof. Shrinivasa Varkhedi

Shodhsamhita : Journal of Fundamental & Comparative Research
Vol. VII, No. 12(II) : 2021
ISSN: 2277-7067

# 'लाला लजपत राय यांचे हिंदू संघटनेतील योगदान'

प्रा.डॉ. राजेंद्र रासकर इतिहास विभाग प्रमुख रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब महाविद्यालय, ८५, शिंदे सरकार वाडा, वार्ड नं ८,औंध, पुणे – 67 (ता.हवेली जि. पुणे. पिन कोड ४११०६७)
ई मेल - yogeshgangurde9579@gmail.com

**प्रास्ताविक :**

लाला लजपत राय यांनी आपल्या आयुष्यात प्रारंभापासून हिंदू संघटनेचे कार्य केले. किंबहुना ते त्यांचे जीवितकार्य होते असे म्हटले तरी चालेल. केवळ परिस्थिती वेगळी होती म्हणून त्या कार्याला त्यांनी स्वत: किंवा दुसऱ्यांनी कोणीही ते नाव दिलेले नाही इतकेच, बाकी कार्य तेच. त्यांनी आर्य समाजात प्रवेश केला तोही याच विचाराने. कारण आर्य समाजाचे ध्येयच वेदांच्या झेंड्याखाली सर्व हिंदूंना एकत्र आणून हिंदू संस्कृतीचे पुनरुज्जीवन करणे आणि हिंदु जाती प्रबळ व संघटित आणि राष्ट्रधर्माने संपन्न करणे हे होते. ते म्हणत, हिंदु जातीच्या गौरव रक्षण्याकरिता व तिला राष्ट्र धर्माची शिकवण देण्याकरिता आर्य समाजाची स्थापना झाली आहे. अर्थात राजकारणापासून किंवा जातीय जीवनाच्या अन्य क्षेत्रापासून आर्य समाज केव्हाही दूर राहू शकत नाही हे त्यांनी ओळखले होते.

**लाला लजपतराय व हिंदू महासभेची स्थापना (1909)**

इ.स. 1909 मध्ये लाला लजपत राय यांची मंडालेच्या तुरुंगातून सुटका झाली. त्यावेळी हिंदुस्थानात मोर्ले मिंटो कायदा जाहीर करण्यात आलेला होता. त्या कायद्याने मुस्लिमांना अनेक सवलती देऊन हिंदू पासून दूर ठेवण्याचा सरकारने प्रयत्न केला होता. सरकारच्या या धोरणामुळे हिंदूंच्या वर फार मोठा परिणाम होणार होता. त्यामुळे हिंदूंना त्यांनी संघटित होण्याचा सल्ला दिला. लाला लजपतराय यांच्या मते मोर्ले मिंटो कायद्यामुळे हिंदू मुस्लिमांच्या दरम्यान धर्म द्वेष वाटेल तशी वाढवणारी काटेरी निवडूंगे रोवून त्यांच्या परस्पर हक्कांच्या सीमांचे भांडण चिरायू करून ठेवीत आहे. सत्ताधारी धूर्त मुत्सद्यांनी मुद्दाम लावलेले हे मत्सराचे निवडूंगे कुंपण हिंदुभूमी च्या अंगावर नाटयासारखे पसरत जाऊन भांडणाची कडू परिणामी आप आणि रक्तपात वाढवित जाणार असे त्यांना स्पष्ट दिसून येऊ लागले.[1]

**पंजाब मध्ये हिंदू सभेची स्थापना**

मुस्लिमांची निरनिराळ्या प्रकारे हिंदूना बाटवून त्यांनी आपली लोकसंख्या कोट्यवधींची वाढवलेली होती. त्यामुळे यावर उपाय न केल्यास त्यांची लोकसंख्या वाढतच जाईल. हिंदू समाज अत्यंत विस्कळीत झाला होता त्यांच्यात धर्माभिमानाचा लवलेश व एकजूट नव्हती. मुस्लिमांच्या विरोधात लढा देण्यासाठी हिंदूंकडे शरीर सामर्थ्य नव्हते. अशी चिंताजनक व लज्जास्पद स्थिती पाहून त्यांना फार वाईट वाटले. तेव्हा हिंदूंचे संघटन करून त्यांना स्वावलंबनाचा धडा शिकवण्याचा त्यांनी निर्धार केला. त्यामुळे त्यांनी इ.स. 1909 साली पंजाब मध्ये हिंदू सभेची स्थापना केली. या सभेची पहिली बैठक सर अतुलचंद चटर्जी यांच्या अध्यक्षतेखाली अनेक विरोधकांचा परिहार करून फारच यशस्वी रीतीने पार पाडली. यामध्ये लाला लजपत राय यांचे फारच उदबोधक असे भाषण होऊन त्यात त्यांनी, " तारे हिंदू संस्कृतीने मूळचे एक कसे व आजचे विस्कळीत कसे, याचे स्पष्ट चित्र उभे करून हिंदूंच्या नाशाची भावी आपत्ती टळण्यासाठी इंग्रजांपुढे नाकदुर्गा काढण्यापेक्षा अथवा मुसलमानां पुढे संघर्ष करण्यापेक्षा आपणच स्वावलंबनाने संघटित होऊन आपले सामर्थ्य वाढविले पाहिजे ही ही गोष्ट श्रोत्यांच्या मनावर चांगलीच बिंबवली. सारा हिंदू समाज जेव्हा ऐक्याने आणि बलवर्धनाने समर्थ आणि तेजस्वी बनेल तेव्हा मुसलमान हिंदूंशी एकी यास करण्यास तयार होतील. आणि फोडा व झोडा ही इंग्रजांची कुटिलनीती व्यर्थ ठरेल." [2]